Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादकः मुकुंदराव शामराव नंन्नवरे



संघर्ष योद्धा मुकुंदभाऊ सपकाळे यांचा ६४ वा वाढदिवस उत्साहात (पान २ वर)

। गुरुवार, दि. ६ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ । अंक ११९। पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

## » Selected

### वैभव सूर्यवंशीबाबत अजिंक्य रहाणेचा सल्ला

**नवी दिल्ली | प्रतिनिधी:** भारताचा युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी याच्या कसोटी भवितव्याबद्दल इतक्यात भाष्य करणे घाईचे ठरेल, असे सांगत माजी कसोटी उपकर्णधार अजिंक्य रहाणेने या युवा खेळाडूवर अनावश्यक दबाव न आणण्याचे आवाहन केले आहे. "आयपीएल आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट यामध्ये मोठा फरक असतो, त्यामुळे वैभवला त्याचा नैसर्गिक खेळ खेळू द्या आणि एक खेळाडू म्हणून त्याला घडण्याची वेळ द्या," असा मोलाचा सल्ला रहाणेने दिला आहे.एका पॉडकास्टवर बोलताना रहाणे म्हणाला, "वैभववर आत्ताच भाष्य करून मला त्याच्यावर अतिरिक्त दडपण आणायचे नाही. तो अजून खूप लहान आहे आणि लोकांनी आधीच त्याच्याबद्दल मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू केली आहे. त्याने आत्तापर्यंत अवघे दोन आयपीएल हंगाम खेळले आहेत.

## महिला आरक्षणाची अंमलबजावणी; मतदारसंघांची पुनर्रचना करण्यासाठी केंद्र सरकारची तयारी

# मतदारसंघ पुनर्रचना विधेयकासाठी हालचाली वेगात!

## विशेष अधिवेशनाची शक्यता, देशाच्या राजकारणात मोठे बदल होणार?

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली । देशाच्या राजकीय आणि संसदीय घडामोडींना नवे वळण देणाऱ्या मतदारसंघ पुनर्रचना विधेयकासह महिला आरक्षणाशी संबंधित घटनादुरुस्ती विधेयक पुन्हा संसदेत मांडण्यासाठी केंद्र सरकारने हालचाली वेगवान केल्याची माहिती समोर येत आहे.**

या दोन्ही महत्त्वाच्या विधेयकांवर चर्चा करून त्यांना मंजुरी मिळवण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्याचे पावसाळी अधिवेशन 13 ऑगस्ट रोजी संपत असून त्यानंतर काही दिवसांत विशेष अधिवेशन होऊ शकते,अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या घटनादुरुस्ती विधेयकांना मंजुरी मिळण्यासाठी लोकसभा आणि राज्यसभेत आवश्यक असलेल्या दोन-तृतीयांश बहुमताची जुळवाजुळव करण्यासाठी सरकारकडून विविध पक्षांशी संपर्क साधला जात आहे. आवश्यक पाठिंबा मिळाल्यास



16, 17 आणि 18 ऑगस्ट या तीन दिवसांत विशेष अधिवेशन बोलावण्याचा सरकारचा विचार असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, याबाबत केंद्र सरकारकडून अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. माहितीनुसार, सरकारने काँग्रेससह प्रमुख विरोधी पक्षांनाही विशेष अधिवेशनाच्या प्रस्तावाबाबत प्राथमिक माहिती दिली आहे. यावर काँग्रेसने इतर विरोधी पक्षांशी चर्चा करून भूमिका स्पष्ट करू, असे संकेत दिल्याचे समजते. त्यामुळे या विधेयकांवर व्यापक राजकीय सहमती निर्माण होते का, याकडे देशाचे लक्ष लागले आहे. मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाचा मुख्य उद्देश नव्या जनगणनेच्या आधारे लोकसभा आणि राज्य विधानसभांच्या मतदारसंघांची नव्याने आखणी करणे हा आहे. त्याचबरोबर महिलांना लोकसभा आणि विधानसभांमध्ये 33 टक्के आरक्षणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचाही सरकारचा प्रयत्न आहे. या प्रक्रियेनंतर देशातील लोकसभा जागांची संख्या 800 पेक्षा अधिक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हे विधेयक मंजूर झाल्यास केंद्र सरकारकडून पुनर्रचना आयोगाची स्थापना करण्यात येईल. हा आयोग नव्या जनगणनेच्या आकडेवारीच्या आधारे मतदारसंघांच्या सीमा निश्चित करणे, लोकसंख्येनुसार जागांचे पुनर्वाटप करणे आणि विविध राज्यांतील प्रतिनिधित्वाचा नव्याने आढावा घेण्याचे काम करेल. त्यामुळे अनेक राज्यांतील लोकसभा मतदारसंघांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे. नव्या जनगणनेच्या आधारे मतदारसंघांची पुनर्रचना करण्याची मागणी सध्या देशातील लोकसभा मतदारसंघांचे वाटप 1971 च्या जनगणनेच्या आधारे निश्चित करण्यात आले आहे.

### देशातील राजकीय वातावरण तापले

नव्या जनगणनेच्या आधारे मतदारसंघांची पुनर्रचना करण्याची मागणी अनेक वर्षांपासून केली जात आहे. आता या प्रक्रियेला गती देण्याच्या दिशेने केंद्र सरकार पावले उचलत असल्याचे मानले जात आहे. दरम्यान, विशेष अधिवेशनाच्या चर्चेमुळे देशातील राजकीय वातावरण तापले असून या विधेयकांवर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये व्यापक चर्चा होण्याची शक्यता आहे. सरकारकडून अधिकृत घोषणा झाल्यानंतरच विशेष अधिवेशनाची तारीख आणि या महत्त्वाच्या विधेयकांच्या पुढील प्रक्रियेचे स्पष्ट चित्र समोर येणार आहे.

## विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयात जोरदार युक्तिवाद

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली । (प्रतिनिधी):** शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्हासंदर्भातील उद्धव ठाकरे गट व एकनाथ शिंदे गटातील वादावर सर्वोच्च न्यायालयात बुधवारी महत्त्वपूर्ण सुनावणी पार पडली. या सुनावणीदरम्यान ठाकरे गटाचे ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कपिल सिब्बल यांनी जवळपास तीन तास सविस्तर युक्तिवाद करत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या निर्णयप्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. अपात्रतेच्या याचिकांवरील निर्णयात झालेल्या विलंबामुळे एका "बेकायदेशीर सरकारने" आपला पूर्ण कार्यकाळ पूर्ण केल्याचा दावा त्यांनी न्यायालयासमोर केला.

सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयानेही एक महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत स्पष्ट केले की, विधिमंडळ पक्षावर मूळ राजकीय पक्षाचे नियंत्रण कायम असते आणि राजकीय पक्षाचा वैध निर्णय हा केवळ विधिमंडळ पक्षाच्या बहुमतापेक्षा अधिक महत्त्वाचा मानला गेला पाहिजे. या निरीक्षणामुळे प्रकरणाला नवे



घटनात्मक महत्त्व प्राप्त झाले आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने पक्षातील बहुमत ठरवण्यासाठी स्पष्ट निकष असणे आवश्यक असल्याचे नमूद केले. अशा निकषांमुळे भविष्यात पक्षफुटी आणि पक्षचिन्हावरील वाद टाळण्यास मदत होईल, असेही न्यायालयाने सूचित केले. कपिल सिब्बल यांनी निवडणूक आयोगाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्हे उपस्थित केले. त्यांनी सांगितले की, आयोगाला कोणत्याही राजकीय पक्षाची घटना वैध किंवा अवैध ठरवण्याचा अधिकार नाही. २०१३ मध्ये शिवसेनेची सुधारित घटना अधिकृतपणे आयोगाकडे सादर करण्यात आली होती आणि तिची पोचपावती आजही आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच २०१८ मधील पक्षांतर्गत निवडणुकांनंतर एकनाथ शिंदे यांची राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य म्हणून नियुक्ती झाली होती आणि ती नियुक्ती तत्कालीन पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीच केली होती. सिब्बल यांनी युक्तिवादात नमूद केले की, २०१४ ते २०२२ या कालावधीत एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली मंत्री म्हणून काम केले. या संपूर्ण काळात त्यांनी ना पक्षघटनेवर आक्षेप घेतला, ना पक्षप्रमुखांच्या अधिकाराला आव्हान दिले. त्यामुळे नंतर घेतलेली भूमिका विसंगत असल्याचा दावा त्यांनी केला. गटनेतेपदाच्या बदलासंदर्भात न्यायालयाने विचारलेल्या प्रश्नावर सिब्बल यांनी स्पष्ट केले की, विधिमंडळ गटाचा नेता बदलण्याचा अधिकार आमदारांना नसून तो मूळ राजकीय पक्षाला आणि पक्षप्रमुखांना आहे.

## एफडीच्या व्याज दराची माहिती बँकांना आधीच द्यावी लागणार

**जन सम्राट टाईम्स**



**नवी दिल्ली : | प्रतिनिधी:** देशातील प्रमुख स्मॉल फायनान्स बँकांमध्ये मुदत ठेव (एफडी) करणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने नवीन मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. त्यानुसार आता स्मॉल फायनान्स बँकांच्या ग्राहकांना व्याज दराची संपूर्ण माहिती आधी मिळेल. हे नवीन नियम आणि नियमन १ ऑक्टोबर २०२६ पासून लागू होणार आहेत. देशभरातील स्मॉल फायनान्स बँकांत एफडीमध्ये गुंतवणूक करणाऱ्या ठेवीदारांसाठी प्रणालीमध्ये अधिक स्पष्टता, पारदर्शकता आणि निष्पक्षता आणणे हा मुख्य उद्देश यामागे असल्याचे सांगण्यात आले. जाणून घ्या नियमांतील पाच प्रमुख बदल आता बँकांना त्यांचे ठेव व्याज दर वेळापत्रक आधीच प्रकाशित करावे लागेल. नियमित आणि मोठ्या ठेवींवरील व्याज बँकेच्या वेबसाईटवर दर्शविलेल्या दरांनुसारच असावे. यामुळे ग्राहकांना वेगवेगळ्या बँकांच्या एफडी दरांची तुलना करणे सोपे होईल. बल्क डिपॉझिटसाठी, स्मॉल फायनान्स बँकांना प्रत्येक व्यावसायिक दिवशी (म्हणजे कामकाजाच्या दिवशी) स. १० वा. त्यांच्या वेबसाईटवर लागू होणारे व्याज दर जारी करावे लागतील. यामध्ये १० मिनिटांचा ग्रेस पीरियड दिला जाईल. म्हणजेच बँका सकाळी १०१.१० पर्यंत त्यांचे दर अपडेट करू शकतील. शेड्यूल्ड कमर्शियल बँका आणि स्मॉल फायनान्स बँकांसाठी ३ कोटी किंवा त्याहून अधिक रकमेच्या सिंगल रुपया टर्म डिपॉझिटला बल्क डिपॉझिट मानले जाते. बँकांच्या सर्व शाखांवर एकसमान व्याज दर मिळतील. म्हणजेच बँक एकाच तारखेला स्वीकारलेल्या समान रकमेच्या ठेवींवर वेगवेगळे दर देऊ शकणार नाहीत. यामुळे ग्राहकांसोबत कोणत्याही शाखेच्या किंवा प्रोफाईलच्या आधारावर भेदभाव होणार नाही आणि सर्वांना समान अधिकार मिळेल. आता स्मॉल फायनान्स बँकांच्या ग्राहकांना व्याज दराची संपूर्ण माहिती आधी मिळेल. हे नवीन नियम आणि नियमन १ ऑक्टोबर २०२६ पासून लागू होणार आहेत. समानतेचा नियम सामान्य किंवा नियमित ठेवींना लागू राहील. तथापि, स्मॉल फायनान्स बँक बल्क ठेवींवर वेगवेगळ्या व्याज दरांची ऑफर देऊ शकतात. हे नियम बँकेने आधीच स्पष्ट करावे लागतील. व्याज दरांमधील हा फरक आरबीआयच्या नियामक चौकटीनुसार ठेवींची स्थिरता आणि तरलता आवश्यकतांसारख्या घटकांवर आधारित असू शकतो. ही सवलत अनिवासी ग्राहकांकडून मिळणाऱ्या बल्क ठेवींनादेखील लागू होईल.

## शिवसेना खटल्यात न्यायालयात सिब्बल यांचा जोरदार युक्तिवाद

### 'राजकीय पक्षाचे वर्चस्वच अंतिम'

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली । (प्रतिनिधी) :** शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्हावरील वादाच्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयात बुधवारी (५ ऑगस्ट) महत्त्वपूर्ण घटनात्मक मुद्द्यांवर सखोल युक्तिवाद झाला. ठाकरे गटाचे ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कपिल सिब्बल यांनी पक्षघटना, पक्षप्रमुखांचे अधिकार, विधिमंडळ पक्षाचे स्थान आणि निवडणूक आयोगाच्या अधिकारक्षेत्रावर विस्तृत मांडणी करत विधानसभा अध्यक्षांच्या निर्णय प्रक्रियेवरही प्रश्नचिन्हे उपस्थित केले. सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत स्पष्ट केले की, "विधिमंडळ पक्षावर मूळ राजकीय पक्षाचे नियंत्रण कायम असते आणि राजकीय पक्षाचा कोणताही वैध निर्णय हा विधिमंडळ पक्षाच्या बहुमताच्या इच्छेपेक्षा वरचढ असतो." न्यायालयाच्या या निरीक्षणाकडे देशभरातील राजकीय आणि कायदेविषयक क्षेत्राचे लक्ष लागले आहे. घटनाक्रम न्यायालयासमोर कपिल सिब्बल यांनी आपल्या युक्तिवादात सांगितले की, बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर उद्धव ठाकरे यांनी पक्षप्रमुखपद स्वीकारले आणि २०२२ पर्यंत एकनाथ शिंदे यांनी पक्षघटनेला किंवा पक्षप्रमुखांच्या अधिकाराला कधीही आव्हान दिले नाही. उलट २०१८ मध्ये उद्धव ठाकरे यांनीच त्यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी नियुक्ती केली होती आणि त्याची माहिती विधानसभा अध्यक्ष तसेच निवडणूक आयोगालाही देण्यात आली होती. निवडणूक आयोगाच्या अधिकारांवर प्रश्न सिब्बल यांनी ठामपणे मांडले की, कोणत्याही राजकीय पक्षाची घटना वैध की अवैध हे ठरवण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला नाही. २०१३ मध्ये सुधारित पक्षघटना आयोगाकडे अधिकृतपणे सादर करण्यात आली होती आणि तिची पोचपावती आजही आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. २०१८ च्या पत्राचा दाखला २७ फेब्रुवारी २०१८ रोजी निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्राचा संदर्भ देताना सिब्बल यांनी सांगितले की, त्यामध्ये २३ जानेवारी २०१८ रोजी झालेल्या संघटनात्मक निवडणुकांनंतरच्या पदाधिकाऱ्यांची यादी देण्यात आली होती. या यादीत एकनाथ शिंदे यांचे नाव राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य म्हणून नमूद होते. त्यामुळे त्या काळात त्यांनी पक्षप्रमुखांच्या अधिकारांना मान्यता दिली होती, हे स्पष्ट होते. निवडणुकीतील यशाचाही उल्लेख २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकांमध्ये उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने यश मिळविल्याचा दाखला देत सिब्बल म्हणाले की, या काळात कोणत्याही घटनात्मक संस्थेने त्यांच्या नेतृत्वावर प्रश्न उपस्थित केला नव्हता. एकनाथ शिंदे हेही त्याच सरकारमध्ये मंत्री म्हणून कार्यरत होते. न्यायमूर्तींकडून प्रश्न, सिब्बल यांचे स्पष्टीकरण सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांनी विधिमंडळ पक्षनेते बदलण्याच्या प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित केले. त्यावर उत्तर देताना सिब्बल यांनी स्पष्ट केले.

## 'JEE'प्रमाणे नीट परीक्षा 2 टप्प्यात घेण्याचा विचार

### केंद्र सरकारने सुप्रीम कोर्टात प्रतिज्ञापत्र केले दाखल

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली । (प्रतिनिधी) :** नीट पेपरफुटीच्या वादानंतर, केंद्र सरकारने राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या (एनटीए) परीक्षा प्रक्रियेत व्यापक फेरबदल केले असून, राष्ट्रीय प्रवेश परीक्षांची अखंडता सुनिश्चित करण्यासाठी आता एक बहुस्तरीय सुरक्षा प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे, अशी माहिती सर्वोच्च न्यायालयाला दिली. एनटीएमध्ये संरचनात्मक सुधारणांची मागणी करणाऱ्या याचिकांना उत्तर देताना, केंद्र सरकारने न्यायालयाच्या २९ मे २०२६ च्या आदेशानुसार अवलंबलेल्या उपाययोजनांचा तपशील दिला. शिक्षण मंत्रालयाच्या उच्च शिक्षण विभागातील सचिव, अरविंद कुमार सिन्हा यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात नमूद केले की, जरी एनटीएने अनेक राष्ट्रीय परीक्षा संगणक-आधारित चाचणीमध्ये रूपांतरित केल्या असल्या तरी, नीट ही तिच्या व्याप्तीमुळे आणि सर्वसमावेशकतेमुळे लेखी स्वरूपात घेतली जाणारी एकमेव प्रमुख परीक्षा आहे. सरकारने म्हटले की, नीटचे संगणक-आधारित चाचणीमध्ये रूपांतरण



सध्या सक्रिय विचाराधीन आहे. तसेच जेईईप्रमाणे दोन-टप्प्यांच्या मॉडेलने सुरुवात करून टप्प्याटप्प्याने होणाऱ्या बदलाचा विचार करत आहेत. सरकारने म्हटले की, उच्चस्तरीय कार्य दलाच्या शिफारशींचा विचार केल्यानंतर, संबंधित भागधारकांशी सल्लामसलत करून आणि विद्यार्थ्यांना पुरेशी पूर्वसूचना दिल्यानंतरच अंतिम निर्णय घेतला जाईल. प्रतिज्ञापत्रानुसार, केंद्राने म्हटले की त्यांनी दोन महत्त्वपूर्ण उपाययोजना केल्या आहेत. पहिली, सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) सुधारणा कायदा, २०२६ लागू करणे, जो २०२४ च्या कायद्यात सुधारणा करतो.. या सुधारणेने पेपरफुटी प्रकरणात अधिक कठोर शिक्षा आणि जलदगती न्यायालयांसाठी तरतुदी आणल्या आहेत. दुसरी, इन्फोसिसचे सह-संस्थापक नंदम निलेकानी यांच्या अध्यक्षतेखाली २७ जून रोजी एक उच्चाधिकार कार्य समिती स्थापन केली आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## राज्यातील आरोग्यसेवा ठप्प होण्याच्या उंबरठ्यावर

### सुपरस्पेशालिस्ट राज्य संघटना संयुक्तपणे आंदोलनात सहभागी होण्याची घोषणा

**जन सम्राट टाईम्स**

**नागपूर | प्रतिनिधी:** महाराष्ट्रातील डॉक्टरांच्या आंदोलनाची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता आहे. नियोजित शस्त्रक्रिया आणि इतर गैर-आकस्मिक वैद्यकीय सेवा बंद केल्यानंतरही सरकारने समाधानकारक निर्णय घेतला नाही, तर गुरुवार, ६ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजल्यापासून आकस्मिक वैद्यकीय सेवाही अनिश्चित काळासाठी बंद करण्याचा इशारा खासगी आणि सरकारी डॉक्टरांच्या संघटनांनी दिला आहे. त्यामुळे राज्यातील आरोग्यसेवेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) महाराष्ट्र, महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स (मार्ड), असोसिएशन ऑफ स्टेट मेडिकल इंटर्न्स (एएसएमआय) आणि सुपरस्पेशालिस्ट राज्य संघटना यांनी संयुक्तपणे आंदोलनात सहभागी होण्याची घोषणा केली आहे. ५ ऑगस्टच्या मध्यरात्रीपासून ६ ऑगस्ट सकाळी ६ वाजेपर्यंत नियोजित आणि गैर-आकस्मिक वैद्यकीय सेवा बंद ठेवण्यात येणार आहेत.




याबाबत मुंबईत सरकारसोबत चर्चा सुरू असून त्यात अद्याप काही तोडगा निघाला नाही. संघटनांचे म्हणणे आहे की, सरकारकडून ६ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत ठोस आणि समाधानकारक निर्णय झाला नाही, तर त्यानंतर आकस्मिक (इमर्जन्सी) वैद्यकीय सेवांसह सर्व सेवा अनिश्चित काळासाठी बंद करण्यात येतील. हा निर्णय रुग्णांच्या हिताविरोधात नसून सरकारच्या निष्क्रिय भूमिकेमुळे घ्यावा लागत असल्याचा दावा डॉक्टरांनी केला आहे. बीएचएमएस–सीसीएमपी नोंदणी प्रक्रियेबाबत स्पष्ट कायदेशीर आणि नियामक चौकट तयार करावी, ती प्रक्रिया तात्काळ स्थगित करावी तसेच निवासी डॉक्टरांच्या प्रलंबित सेवा, प्रशिक्षण आणि कल्याणाशी संबंधित मागण्यांवर त्वरित निर्णय घ्यावा, अशी प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. संघटनांच्या मते, अनेकदा सकारात्मक संवाद साधूनही सरकारने कोणतीही ठोस हमी दिलेली नाही. त्यामुळे वैद्यकीय शिक्षणाची गुणवत्ता, रुग्णांची सुरक्षितता आणि राज्यातील आरोग्य व्यवस्थेवरील विश्वास धोक्यात येत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. सरकारने वेळेत तोडगा न काढल्यास केवळ नियोजित उपचारच नव्हे, तर आकस्मिक वैद्यकीय सेवांवरही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे गंभीर रुग्ण, अपघातग्रस्त आणि तातडीच्या उपचारांची गरज असलेल्या नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

### आकस्मिक सेवा बंद करण्याचा निर्णय का?

या आंदोलनात इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) महाराष्ट्र, महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स (मार्ड), असोसिएशन ऑफ स्टेट मेडिकल इंटर्न्स (एएसएमआय) आणि सुपरस्पेशालिस्ट राज्य संघटना सहभागी असून सर्व संघटनांनी एकत्रित भूमिका घेतली आहे. मुंबईत सरकारसोबत चर्चा सुरू असून त्यात अद्याप काही तोडगा निघाला नाही. संघटनांचे म्हणणे आहे की, सरकारकडून ६ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत ठोस आणि समाधानकारक निर्णय झाला नाही, तर त्यानंतर आकस्मिक (इमर्जन्सी) वैद्यकीय सेवांसह सर्व सेवा अनिश्चित काळासाठी बंद करण्यात येतील.

# साक्री पोलिसांची मोठी कारवाई; 2 लाख 3 हजारांचा एमडी व डोडा अंमली पदार्थ जप्त!

## आरोपीची अंगझडतीत १८ ग्रॅम वजनाची तपकिरी रंगाची एमडी (मेफेड्रॉन) पावडर जप्त

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** अंमली पदार्थांच्या अवैध विक्री व वाहतुकीवर नियंत्रण मिळवण्यासाठी धुळे पोलिसांनी सुरू केलेल्या मोहिमेत साक्री पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. पोलिसांनी सुमारे २ लाख ३ हजार २५ रुपये किमतीचा एमडी (मेफेड्रॉन) व डोडा (पॉपी स्ट्रॉ) अंमली पदार्थांचा साठा जप्त करून एका आरोपीला अटक केली आहे. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी धुळे जिल्ह्यात चोरीचे गुन्हे, अंमली पदार्थांची वाहतूक व अन्य गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी गस्त व कारवाई करण्याचे निर्देश सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यानुसार, ४ ऑगस्ट २०२६ रोजी साक्री पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक दिपक वळवी यांना गोपनीय माहिती मिळाली की, शेवाळी (ता. साक्री) गाव शिवारातील एच.पी. पेट्रोल पंपाजवळील हॉटेल सतलज येथे एक इसम एमडी (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून आहे. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक दिपक वळवी यांनी पथक तयार करून संबंधित ठिकाणी रवाना केले.

पथकाने हॉटेल सतलज परिसरात जाऊन माहितीची खात्री केली



असता, एक इसम पोलिसांना पाहून संशयास्पद हालचाली करताना दिसून आला. तो काहीतरी लपवण्याचा प्रयत्न करत असल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. चौकशी केली असता त्याने आपले नाव राजकुमार मुल्कराज वाल्मीकी (वय ४२ वर्षे, रा. मुक्तासर रोड, कोटकपूर, फरीदकोट, पंजाब; सध्या रा. इंद्रा कॉलनी, वॉर्ड क्रमांक १.३७७ किलो वजनाचा डोडा (पॉपी स्ट्रॉ) अंमली पदार्थ ०.१५८ ग्रॅम डोडा पावडर असा एकूण २,०३,०२५ रुपये किमतीचा अंमली पदार्थांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. याप्रकरणी आरोपी राजकुमार मुल्कराज वाल्मीकी याच्याविरुद्ध साक्री पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक २३२/२०२६ अन्वये गुंगीकारक औषधी द्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ मधील कलम ८(क), १५(क), २२(ब), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास साक्री पोलीस करीत आहेत. अंमली पदार्थांच्या अवैध विक्री व वाहतुकीवर नियंत्रण मिळवण्यासाठी धुळे पोलिसांनी सुरू केलेल्या मोहिमेत साक्री पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. पोलिसांनी सुमारे २ लाख ३ हजार २५ रुपये किमतीचा एमडी (मेफेड्रॉन) व डोडा (पॉपी स्ट्रॉ) अंमली पदार्थांचा साठा जप्त करून एका आरोपीला अटक केली आहे. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी धुळे जिल्ह्यात चोरीचे गुन्हे, अंमली पदार्थांची वाहतूक व अन्य गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी गस्त व कारवाई करण्याचे निर्देश सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यानुसार, ४ ऑगस्ट २०२६ रोजी साक्री पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक दिपक वळवी यांना गोपनीय माहिती मिळाली की, शेवाळी (ता. साक्री) गाव शिवारातील एच.पी. पेट्रोल पंपाजवळील हॉटेल सतलज येथे एक इसम एमडी (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून आहे.

---

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# जळगाव स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

## ३० हजारांची चोरीची मोटारसायकल जप्त



जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील वाढत्या वाहन चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत ३० हजार रुपये किमतीची चोरीची मोटारसायकल जप्त केली असून रेकॉर्डवरील एका आरोपीला अटक केली आहे. आरोपीने जळगाव महानगरपालिकेच्या पार्किंगमधून मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली आहे. जिल्ह्यातील वाहन चोरीच्या गुन्ह्यांची उकल करून चोरीस गेलेली वाहने हस्तगत करण्याबाबत पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना मार्गदर्शक सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांनी विशेष पथक तयार करून समांतर तपास सुरू केला. तपासादरम्यान पथकाला विश्वासार्ह माहिती मिळाली की, रेकॉर्डवरील आरोपी विभोर जुलाल जाधव (रा. एरंडोल, सध्या रा. विवरे खुर्द, ता. रावेर) याच्याकडे चोरीची हिरो एच.एफ. डिलक्स मोटारसायकल आहे. या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने विवरे खुर्द येथे सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान सुरुवातीला आरोपीने उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, कसून चौकशी केल्यानंतर त्याने जळगाव महानगरपालिकेच्या पार्किंगमधून मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीकडून लाल-काळ्या रंगाची हिरो एच.एफ. डिलक्स (क्रमांक MH-19-BT-9433) ही मोटारसायकल जप्त करण्यात आली. जिल्हा गुन्हे अभिलेखाची पडताळणी केली असता, या मोटारसायकलबाबत जळगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १९६/२०२३ अंतर्गत भारतीय दंड संहितेच्या कलम ३७९ नुसार वाहन चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले. पोलीस तपासात आरोपीविरुद्ध यापूर्वीही घरफोडी व चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे समोर आले असून, त्याचा इतर गुन्ह्यांमध्येही सहभाग असण्याची शक्यता पोलीस तपासत आहेत.

आरोपीला अटक करण्यात आली असून पुढील तपास जळगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक नंदलाल पाटील करीत आहेत.


---

# जळगाव–शेळगाव मार्गावरील 'खारी दाब'पूल खचला; मोठ्या अपघाताची भीती

## शेतकऱ्यांचे सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन

जन सम्राट टाईम्स

**जळगाव| प्रतिनिधी:** असोदा बायपासनंतर जळगाव–शेळगाव मार्गावरील भारत पेट्रोलियम पंपाजवळ, हॉटेल साई बाबा परिसरातील 'खारी दाब' पूल मुसळधार पावसामुळे एका बाजूने खचल्याने वाहनचालकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पुलालगत मोठी दरड निर्माण झाल्याने कोणत्याही क्षणी भीषण अपघात होण्याची भीती व्यक्त होत असून, असोदा परिसरातील शेतकऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तातडीच्या दुरुस्तीची मागणी केली आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या ठिकाणी पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी आवश्यक क्षमतेचे पाइप न टाकता नाली दाबण्यात आली आहे. परिणामी, पावसाचे पाणी थेट रस्त्यावर साचून पुलावरून वाहत 'खारी दाब'मध्ये जात आहे. सततच्या पाण्याच्या प्रवाहामुळे पुलाच्या एका बाजूचा भाग खचला असून रस्त्याच्या कडेला मोठी दरड निर्माण झाली आहे. या मार्गावरून दररोज मोठ्या



प्रमाणात वाहनांची तसेच शेतकऱ्यांची ये-जा होत असते. दरड रस्त्यालगतच निर्माण झाल्याने विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा मुसळधार पावसात वाहन घसरून खोल भागात जाण्याचा धोका वाढला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या ठिकाणी पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी आवश्यक क्षमतेचे पाइप न टाकता नाली दाबण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी सांगितले की, गेल्या काही वर्षांपासून या परिसरात रस्ता खचण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. यावर्षी जानेवारी महिन्यात रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली होती; मात्र काही महिन्यांतच पुन्हा तीच समस्या निर्माण झाल्याने कामाच्या गुणवत्तेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या पार्श्वभूमीवर असोदा येथील शेतकऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (PWD) अभियंत्यांना निवेदन सादर केले आहे. बंद झालेली नाली तातडीने मोकळी करून पाण्याचा निचरा सुरळीत करावा, खचलेल्या पुलाची त्वरित दुरुस्ती करून मजबूत संरक्षण कठडे उभारावेत तसेच वाहनचालकांच्या सुरक्षेसाठी इशारा फलक व अन्य सुरक्षात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदनावर परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असून, संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

---

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला 'लोकनेते दि. बा. पाटील'यांचे नाव द्या

## नामांतर संघर्ष समितीची केंद्र सरकारकडे जोरदार मागणी

जन सम्राट टाईम्स

**पारोळा | प्रतिनिधी:** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला 'लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ' असे नामकरण करण्यात यावे, या मागणीसाठी नामांतर संघर्ष समितीच्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध लोकप्रतिनिधींनी गुरुवारी दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन केले. या आंदोलनानंतर केंद्रीय नागरी उड्डाणमंत्री राममोहन नायडू किंजरापु यांच्या उपस्थितीत संघर्ष समितीच्या प्रतिनिधींसोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे उपस्थित होते. बैठकीत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण 'लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ' असे करण्याच्या मागणीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. संघर्ष समितीच्या प्रतिनिधींनी लोकभावनांचा आदर राखत केंद्र सरकारने या मागणीवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी



भूमिका मांडली. बैठकीदरम्यान केंद्रीय नागरी उड्डाणमंत्र्यांनी या विषयाकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले जाईल आणि योग्य निर्णय घेण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याची माहिती संघर्ष समितीच्या वतीने देण्यात आली. या आंदोलनात आणि बैठकीत खासदार नरेश म्हस्के, सुरेश उर्फ बाळ्यामामा म्हात्रे, निलेश लंके, बजरंग सोनवणे, धैर्यशील पाटील यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी, नामांतर संघर्ष समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामांतराचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत असून, लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाने विमानतळाचे नामकरण करण्याची मागणी सातत्याने होत आहे. जंतर-मंतरवरील आंदोलनानंतर केंद्र सरकारकडून मिळालेल्या सकारात्मक आश्वासनामुळे या मागणीला नव्याने बळ मिळाल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला 'लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ' असे नामकरण करण्यात यावे, या मागणीसाठी नामांतर संघर्ष समितीच्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध लोकप्रतिनिधींनी गुरुवारी दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन केले. या आंदोलनानंतर केंद्रीय नागरी उड्डाणमंत्री राममोहन नायडू किंजरापु यांच्या उपस्थितीत संघर्ष समितीच्या प्रतिनिधींसोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

---

# सीजेपी आंदोलनाची दिशा आज ठरणार; अभिजित दीपके यांच्या घरी कोअर कमिटीची बैठक

जन सम्राट टाईम्स

**छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी:** नवी दिल्लीतील जंतरमंतरवरील आंदोलनानंतर कॉक्रोच जनता पार्टीची (सीजेपी) पुढील रणनीती ठरविण्यासाठी वाळूज महानगर येथे संस्थापक, अध्यक्ष अभिजित दीपकेयांच्या घरी बुधवारी कोअर कमिटीची बैठक झाली. आज, गुरुवारीही बैठक होणार असून, सर्व मुद्यांवर चर्चा झाल्यानंतर दुपारी दोन वाजता पक्षाची पुढील दिशा प्रसारमाध्यमांसमोर जाहीर केली जाणार असल्याची माहिती दीप यांनी दिली. जंतरमंतरवरील आंदोलनाला मोठे समर्थन मिळाल्याने लोकांच्या अपेक्षा वाढल्या असून, देशभरात संघटन कसे वाढवायचे, आंदोलनाची पुढील दिशा काय असावी, यावर बैठकीत चर्चा होत असल्याचे त्यांनी सांगितले. 'बीफ खाणारा प्रभू रामाच्या भूमिकेसाठी योग्य नाही' लोकप्रिय अभिनेत्रीचा रणबीर कपूरवर संताप; म्हणाली, 'ही भूमिका एक मोठी जबाबदारी' 'तीन महिने ते एका विवाहित जोडप्याप्रमाणे एकत्र राहिले', श्रीदेवी आणि मिथुन यांच्याबद्दलच्या दाव्याची चर्चा 'स्वभाव तापट, मी त्यांची वाईट बाजूही पाहिली आहे', नाना पाटेकरांबद्दल डिंपल कपाडिया यांचं वक्तव्य जिया शंकरनं गुपचूप उरकला साखरपुडा, दाखवली होणाऱ्या नवऱ्याची झलक; म्हणाली, 'हा प्रवास सोपा नव्हता' शिक्षण, राजकारण, न्याय व्यवस्था, निवडणूक विभाग, बेरोजगारी, देशातील आर्थिक संकट, ई-२० आणि प्रसारमाध्यमे आदी विषयांवर बैठकीत चर्चा होणार आहे. बैठकीस सौरभ दास, आशुतोष रांका, वैष्णवी गौर, रत्ना सिंग, दीपक चौधरी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

---

# संघर्ष योद्धा मुकुंदभाऊ सपकाळे यांचा ६४ वा वाढदिवस उत्साहात

## उत्तर महाराष्ट्रातून शुभेच्छांचा वर्षाव



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** बहुजन समाजातील कार्यकर्ते व सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेले संघर्ष योद्धा मुकुंदभाऊ सपकाळे यांचा ६४ वा वाढदिवस जळगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त विविध राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांची सदिच्छा भेट घेत शुभेच्छा दिल्या.

यावेळी मुकुंदभाऊ सपकाळे यांच्या सामाजिक कार्याचा आणि विविध प्रश्नांवर त्यांनी केलेल्या पाठपुराव्याचा गौरव करण्यात आला. अनेक मान्यवरांनी त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त करत समाजहिताच्या कार्यात त्यांचे योगदान असेच सुरू राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी पालकमंत्री तथा राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, माजी सभापती मुकुंदराव ननवरे, राष्ट्रीय भीमसेनेचे जिल्हाध्यक्ष वाल्मिक जाधव, वीर सावरकर युनियनचे जिल्हाध्यक्ष दिलीपभाऊ सपकाळे, महेंद्र केदार यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. त्यांनी मुकुंदभाऊ सपकाळे यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनीही उपस्थित राहून शुभेच्छांचा वर्षाव केला. समाजातील वंचित घटकांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणाऱ्या नेतृत्वाची गरज असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले. कार्यक्रमात उपस्थितांनी मुकुंदभाऊ सपकाळे यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि समाजसेवेच्या कार्यासाठी निरंतर ऊर्जा लाभो, अशा शुभेच्छा दिल्या. वाढदिवसानिमित्त दिवसभर शुभेच्छा देण्यासाठी समर्थक, हितचिंतक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

---

# महात्मा फुले जनआरोग्य योजनेतील गैरप्रकारांची एसआयटीमार्फत चौकशी


## १५,४०७ संशयास्पद दावे रडारवर; बोगस उपचार, मृतांच्या नावावर दावे

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** राज्यातील 'आयुष्यमान भारत–पंतप्रधान जनआरोग्य योजना' आणि 'महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना' यांतील कथित गैरप्रकारांची गंभीर दखल घेत महाराष्ट्र शासनाने विशेष चौकशी पथक (एसआयटी) स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या दोन्ही आरोग्य योजनांच्या माध्यमातून सादर करण्यात आलेल्या हजारो संशयास्पद उपचार दाव्यांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली १० जुलै रोजी विधानभवनात झालेल्या आढावा बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. बैठकीदरम्यान भाजपचे आमदार राहुल आहेर यांनी नाशिक जिल्ह्यात महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत झालेल्या कथित गैरव्यवहाराची माहिती सादर केली होती. त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी संपूर्ण प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करण्याची घोषणा केली.

१५ हजारांहून अधिक संशयास्पद दावे तपासणार जुलै २०२४ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राज्यभरातील पोर्टलवर दाखल झालेल्या १५,४०७ संशयास्पद वैद्यकीय दाव्यांची




तपासणी केली जाणार आहे. प्राथमिक पडताळणीत अनेक गंभीर अनियमितता आढळून आल्या आहेत. एकाच मोबाईल क्रमांकाचा वापर करून अनेक रुग्णांची नोंदणी करणे, चुकीची माहिती भरून उपचाराचे दावे सादर करणे, तसेच एका वर्षात वारंवार पाच लाख रुपयांपेक्षा अधिक रकमेचे दावे दाखल करणे, अशा प्रकारांमुळे सार्वजनिक आरोग्य विभाग सतर्क झाला आहे. मृतांच्या नावावरही उपचाराचे दावे प्राथमिक तपासात काही रुग्णालयांनी बोगस कागदपत्रांच्या आधारे शासनाची आर्थिक फसवणूक केल्याचे समोर आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, काही प्रकरणांमध्ये मृत व्यक्तींच्या नावावर उपचार दाखवून शासनाकडून निधी उचलल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे या प्रकरणाची व्याप्ती अपेक्षेपेक्षा अधिक मोठी असल्याचे मानले जात आहे. नाशिकमधील तीन रुग्णालयांवर गुन्हे या तपासाचा भाग म्हणून सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सूचनेनुसार नाशिकमधील शिव मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल, क्रिटिकेअर हॉस्पिटल आणि ग्रेस हॉस्पिटल यांच्या संस्थापकांविरुद्ध मुंबईतील वरळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या रुग्णालयांनी ३६१ बोगस उपचार दाव्यांच्या माध्यमातून सुमारे १.७९ कोटी रुपयांचा अपहार केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. जिल्हास्तरावर प्रत्यक्ष पडताळणीचे आदेश राज्य सरकारने सर्व जिल्हा शल्यचिकित्सक आणि आरोग्य अधिकाऱ्यांना संशयास्पद दाव्यांची प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन पडताळणी करण्याचे निर्देश दिले आहेत. लाभार्थी, रुग्णालये, उपचार नोंदी आणि सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांची स्वतंत्र छाननी केली जाणार असून, गैरप्रकार सिद्ध झाल्यास संबंधितांवर भारतीय न्याय संहितेतील फसवणूक, बनावट कागदपत्रे तयार करणे आणि आर्थिक अपहाराशी संबंधित विविध कलमांनुसार कठोर कारवाई केली जाणार आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# शहीद भैय्यासाहेब बागुल स्मारकाचे भूमिपूजन

## शहीद भैय्यासाहेब बागुल स्मारकासाठी १५ लाख रुपयांची करण्यात आली तरतूद

जन सम्राट टाईम्स

**नगरदेवळा बु. | प्रतिनिधी:** देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या वीर जवानांच्या स्मृती चिरंतन राहाव्यात आणि भावी पिढीला देशभक्तीची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने नगरदेवळा बु. येथे शहीद सैनिक भैय्यासाहेब रोहीदास बागुल यांच्या स्मारकाचे भूमिपूजन तसेच 'वीर माती संकलन' सोहळा अत्यंत भावपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात तहसीलदार विजय बनसोडे यांनी प्रशासकीय प्रोटोकॉल बाजूला ठेवत शहीद स्मारकाची पवित्र माती स्वतः जळगाव जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात जमा करून देशप्रेमाचा आदर्श घालून दिला. राज्य शासनाने जळगाव जिल्ह्यातील २९ गावांमध्ये शहीद स्मारके उभारण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या नाविन्यपूर्ण योजनेतून ४ कोटी ३५ लाख रुपयांच्या निधीला मंजुरी दिली असून प्रत्येक स्मारकासाठी १५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या निधीसाठी पाचोरा-भडगाव मतदारसंघाचे आमदार किशोर (आप्पा) पाटील यांनी विशेष पाठपुरावा केला होता. नगरदेवळा बु. ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने आयोजित कार्यक्रमात शहीद भैय्यासाहेब बागुल यांच्या स्मारक भूमीचे विधिवत भूमिपूजन करण्यात आले.



त्यानंतर 'वीर माती संकलन' सोहळाही पार पडला. या वेळी संकलित झालेली माती त्याच दिवशी जळगाव जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात जमा करणे आवश्यक होते. वेळेअभावी माती कशी पोहोचवायची, अशी चिंता व्यक्त होताच तहसीलदार विजय बनसोडे यांनी तत्काळ पुढाकार घेत, "मी स्वतः जळगावला जात आहे, ही माती मीच पोहोचवतो," असे सांगत ती स्वतः सैनिक कल्याण कार्यालयात जमा केली. त्यांच्या या कृतीचे उपस्थित ग्रामस्थ, माजी सैनिक आणि अधिकाऱ्यांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. कार्यक्रमात बोलताना तहसीलदार विजय बनसोडे म्हणाले, "शहीद भैय्यासाहेब बागुल यांना वीरमरण येऊन २६ वर्षे झाली असली तरी नगरदेवळा ग्रामस्थांनी त्यांच्या स्मृती जिवंत ठेवल्या आहेत. हा गावाच्या देशभक्तीचा आणि आजी-माजी सैनिकांच्या संस्कारांचा गौरव आहे." सैनिकांच्या त्यागामुळेच देश सुरक्षित असल्याचे सांगत त्यांनी सैनिकांचा सर्वोच्च सन्मान राखण्याचे आवाहनही केले.

आजी-माजी सैनिक संघाचे प्रमुख ऑनररी कॅप्टन ज्ञानेश्वर महाजन यांनी शहीद भैय्यासाहेब बागुल यांच्या शौर्याची आठवण करून दिली. "देशरक्षण करताना त्यांनी अंगावर ३० गोळ्या झेलून मातृभूमीसाठी सर्वोच्च बलिदान दिले. त्यांच्या प्रेरणेने आज नगरदेवळा गावातील शेकडो युवक भारतीय सैन्यात भरती होऊन देशसेवा करत आहेत," असे ते म्हणाले. कार्यक्रमादरम्यान तहसीलदार विजय बनसोडे यांनी माजी सैनिकांच्या विविध अडचणी जाणून घेत संबंधित अधिकाऱ्यांना त्या तातडीने सोडविण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे माजी सैनिकांनी समाधान व्यक्त केले. या सोहळ्यास शहीद भैय्यासाहेब बागुल यांच्या वीरमाता तुळसाबाई रोहीदास बागुल यांची विशेष उपस्थिती होती. तसेच ऑनररी कॅप्टन ज्ञानेश्वर महाजन यांच्यासह आजी-माजी सैनिक, सरपंच किरण काटकर, मंडळ अधिकारी राहुल पवार, ग्राम महसूल अधिकारी तात्याराव सपकाळ, बबन मंडले, उमेश सोनवणे, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी माजी सैनिकांच्या वतीने तहसीलदार विजय बनसोडे यांचा नागरी सत्कार करण्यात आला. शहीद स्मारकाच्या उभारणीमुळे नगरदेवळा परिसरातील भावी पिढीमध्ये देशभक्तीची प्रेरणा अधिक दृढ होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# जळगाव राष्ट्रीय महामार्गावरील अपघात

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | प्रतिनिधी:** जळगाव शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर अपघातांचे सत्र सुरूच असून, एकाच दिवसात दोन बळी गेल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि हळहळ व्यक्त केली जात आहे. नशिराबाद टोलनाक्याजवळ भरधाव ट्रोलाने पिकअपला दिलेल्या जोरदार धडकेत एका २९ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे.

* मृतकाचे नाव: सोनू रामा बागले (वय २९, रा. भवानी नगर, नशिराबाद)

घटना: नशिराबाद टोलनाक्याजवळ भरधाव ट्रोलाने पिकअपला जोरदार धडक दिली, ज्यामुळे या मजुराचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

नागरिकांची आक्रमक मागणी एकाच दिवसात महामार्गावर दोन जीव गेल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे. अवजड वाहनांच्या वेगावर नियंत्रण आणावे आणि रस्ता सुरक्षेच्या तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी आक्रमक मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



जळगाव शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर अपघातांचे सत्र सुरूच असून, एकाच दिवसात दोन बळी गेल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि हळहळ व्यक्त केली जात आहे. नशिराबाद टोलनाक्याजवळ भरधाव ट्रोलाने पिकअपला दिलेल्या जोरदार धडकेत एका २९ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे.

* मृतकाचे नाव: सोनू रामा बागले (वय २९, रा. भवानी नगर, नशिराबाद)

घटना: नशिराबाद टोलनाक्याजवळ भरधाव ट्रोलाने पिकअपला जोरदार धडक दिली

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# आबासाहेब पाटील व विकास सूर्यवंशी यांचा सत्कारपूर्वक निरोप

## पिंपळगाव पोलीस ठाण्यात बदली



जन सम्राट टाईम्स

**पाचोरा | प्रतिनिधी :** पाचोरा पोलीस ठाण्यात विशेष पोलीस कर्मचारी म्हणून न्यायालयीन कामकाजासाठी नियुक्त असलेले आबासाहेब पाटील आणि विकास सूर्यवंशी यांची पिंपळगाव पोलीस ठाण्यात बदली झाल्याने पाचोरा पोलीस ठाण्यात त्यांचा सत्कार व निरोप समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या प्रसंगी पाचोरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार यांच्या उपस्थितीत दोन्ही कर्मचाऱ्यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रदीप शेवाळे, पोलीस उपनिरीक्षक सुनील ठाकूर, योगेश गणगे, कृष्णा घायाळ, सुनील पाटील यांच्यासह पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आबासाहेब पाटील आणि विकास सूर्यवंशी यांनी पाचोरा पोलीस ठाण्यात सेवा बजावताना दाखविलेली कर्तव्यनिष्ठा, शिस्त, प्रामाणिकपणा आणि जबाबदारीची भावना यांचे कौतुक केले. न्यायालयीन कामकाजात त्यांनी केलेल्या उल्लेखनीय योगदानामुळे अधिकारी आणि सहकाऱ्यांमध्ये त्यांच्याबद्दल विशेष आदर आणि आपुलकी निर्माण झाली होती, असेही वक्त्यांनी नमूद केले. पिंपळगाव पोलीस ठाण्यात बदली झाल्याने पाचोरा पोलीस ठाण्यात त्यांचा सत्कार व निरोप समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या प्रसंगी पाचोरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार यांच्या उपस्थितीत दोन्ही कर्मचाऱ्यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. निरोप समारंभात दोन्ही कर्मचाऱ्यांनी पाचोरा पोलीस ठाण्यातील सेवाकाळातील अनुभवांना उजाळा देत सर्व अधिकारी, कर्मचारी आणि सहकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. मिळालेल्या मार्गदर्शनामुळे सेवा अधिक प्रभावीपणे बजावता आली, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. समारोपावेळी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दोघांनाही पिंपळगाव पोलीस ठाण्यातील नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छा देत, तेथेदेखील आपल्या प्रामाणिक व कर्तव्यदक्ष कार्यशैलीने उत्तम सेवा बजावतील, असा विश्वास व्यक्त केला. भावनिक वातावरणात पार पडलेल्या या निरोप समारंभाने सहकाऱ्यांमधील स्नेह, सहकार्य आणि सेवाभावाचे दर्शन घडविले.

# गारपीडग्रस्त शेतकरी नुकसानभरपाईपासून वंचित; राष्ट्रवादी व शिवसेनेकडून तहसीलदारांना निवेदन

## मार्च महिन्यातील गारपीटीनंतर पंचनामे, ई-केवायसी पूर्ण

जन सम्राट टाईम्स



**साक्री| प्रतिनिधी:** मार्च महिन्यात साक्री तालुक्यात झालेल्या भीषण गारपीटीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अद्याप नुकसानभरपाई मिळालेली नसल्याने संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष) आणि शिवसेना यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी साक्री तहसीलदारांना निवेदन देऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने भरपाई वितरित करण्याची मागणी करण्यात आली. गेल्या उन्हाळ्यात मार्च महिन्यात साक्री तालुक्यात झालेल्या गारपीटीमुळे कांदा, मका, पपई, डाळिंब तसेच विविध उन्हाळी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. चार-पाच महिने कष्ट करून जोपासलेली पिके काढणीच्या उंबरठ्यावर असतानाच गारपीटीने उद्ध्वस्त झाली. त्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असून त्यांचे मानसिक खच्चीकरणही झाले. गारपीटीनंतर महसूल विभाग आणि कृषी विभागाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतांची पाहणी करून पंचनामे केले. त्यानंतर पात्र लाभार्थ्यांच्या याद्याही जाहीर करण्यात आल्या. शासनाच्या सूचनेनुसार सर्व पात्र शेतकऱ्यांनी ई-केवायसी (e-KYC) प्रक्रियाही पूर्ण केली. मात्र, सर्व प्रक्रिया पूर्ण होऊनही आजपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसानभरपाई जमा झालेली नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष) जिल्हाध्यक्ष जितेंद्र मराठे आणि शिवसेना तालुकाप्रमुख पंकज मराठे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी आणि पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार सोनवणे यांची भेट घेत निवेदन सादर केले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, कावठे, भाडणे, पेरेजपूर, आष्टाणे, छडवेल (प.) , काटवान तसेच तालुक्यातील इतर भागांमध्ये गारपीटीमुळे उन्हाळी पिकांचे जवळपास १०० टक्के नुकसान झाले होते. संबंधित यंत्रणांनी पंचनामे करून लाभार्थ्यांच्या याद्या जाहीर केल्या असतानाही प्रत्यक्ष मदत अद्याप मिळालेली नाही. यावर्षी पावसाळा उशिरा सुरू झाल्याने खरीप हंगामाच्या पेरणीसाठी शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला. नुकसानभरपाईची रक्कम वेळेत मिळाली असती, तर पेरणीसाठी मोठा आधार मिळाला असता. मात्र आर्थिक संकटाचा सामना करत शेतकऱ्यांनी कर्ज काढून किंवा अन्य मार्गाने पेरणी पूर्ण केली असून आता तरी शासनाने नुकसानभरपाई तातडीने वितरित करावी, अशी मागणी करण्यात आली.

# वर्षावास प्रवचनमालेचे दुसरे पुष्प संपन्न; 'बोधिसत्त्व गौतमांचा जन्म आणि प्रव्रज्या' विषयावर मार्गदर्शन

## सामूहिक त्रिशरण-पंचशील व खिरदानाने कार्यक्रमाची सांगता

जन सम्राट टाईम्स



**धुळे। (प्रतिनिधी):** भारतीय बौद्ध महासभा, जिल्हा शाखा धुळे यांच्या वतीने आषाढ ते अश्विन पौर्णिमेदरम्यान आयोजित करण्यात आलेल्या वर्षावास प्रवचनमालेतील दुसरे प्रवचन पुष्प मोहाडी उपनगर येथील शांतीदूत बुद्ध विहारात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. रामराजे परिवाराच्या पुढाकारातून आयोजित या धार्मिक व प्रबोधनपर कार्यक्रमाला धम्म उपासक-उपासिका आणि प्रबुद्ध नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कामगार नेते आप्पासाहेब एस. यू. तायडे होते. प्रमुख अतिथी म्हणून सुरेश आण्णा लोंढे (महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष, भारतीय बौद्ध महासभा), महेंद्र आण्णा महाले (धुळे जिल्हाध्यक्ष, भारतीय बौद्ध महासभा), ज्येष्ठ बौद्धाचार्य पोपटराव मोहिते, भटूभाऊ वाघ, प्रसेनजीत चव्हाण, अरुणाताई रामराजे, नौसरबाई जाधव, सुहास रामराजे, करिष्माताई रामराजे, मयुरी जाधव, हर्ष मोरे, चंदाताई केदार, अनिल केदार आणि काजलताई केदार उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर धम्म उपासिका यशोदाताई सपकाळ यांनी 'बोधिसत्त्व सिद्धार्थ गौतमांचा जन्म आणि प्रव्रज्या' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी भगवान बुद्धांच्या जीवनप्रवासातील महत्त्वपूर्ण टप्पे, त्याग, करुणा आणि मानवकल्याणाचा संदेश यावर प्रकाश टाकत उपस्थितांना धम्माचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाला भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी भानुदास भवरे, यशोदाताई बागुल, नानाजी अहिरे, भगवान वाघ, विनोद केदार, उत्तरेश्वर गायकवाड, राहुल मोरे, सुनील मोरे, भारत खैरनार यांच्यासह नीलिमा भामरे, वरुण जाधव, पृथ्वीराज जाधव, आर्यन रामराजे, वंश केदार, सुमित घोडसे, संदीप घोडसे, दुर्गेश वानखेडे, राजरत्न वाघ, दीपक वानखेडे, संगीता खैरनार, वसंत नेरकर, अक्काबाई खैरनार तसेच प्रबुद्ध भारत मित्र मंडळाचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने धम्म उपासक-उपासिका उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन केंद्रीय शिक्षक तथा बौद्धाचार्य अशोकभाऊ शिरसाठ यांनी केले. कार्यक्रमाची सांगता सामूहिक त्रिशरण व पंचशील ग्रहण करून करण्यात आली. यानंतर रामराजे परिवाराच्या वतीने उपस्थितांसाठी फलाहार आणि खिरदानाचे वितरण करण्यात आले. वर्षावास प्रवचनमालेच्या माध्यमातून समाजात धम्म, नैतिक मूल्ये आणि सामाजिक प्रबोधनाचा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# रोटरी क्लबकडून कन्या विद्यालयाला क्रीडा साहित्य भेट

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा । प्रतिनिधी:** रोटरी क्लब ऑफ पाचोरा-भडगावच्या वतीने शहरातील माध्यमिक व उच्च माध्यमिक (मिठाबाई) कन्या विद्यालयाला विविध प्रकारचे क्रीडा साहित्य भेट देण्यात आले.

विद्यार्थिनींमध्ये क्रीडाविषयीची आवड वाढावी आणि त्यांना उत्तम सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने आयोजित कार्यक्रम ५ ऑगस्ट रोजी पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला रोटरी क्लबचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शिवाजी शिंदे, प्रशासन सचिव डॉ. स्वप्निल पाटील, प्रोजेक्ट सचिव डॉ. प्रशांत सांगडे, प्रकल्पाचे चेअरमन रो. गिरीश दुसाने, असिस्टंट गव्हर्नर रो. भरत सिनकर, एन्क्लेव्ह सचिव डॉ. मुकेश तेली, ज्येष्ठ रोटेरियन चंद्रकांत लोढाया, डॉ. सिद्धांत तेली, डॉ. कुणाल पाटील, निखिल बिडकर, हर्षल चित्ते, पिंकीताई जिनोदिया, संजय पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विद्यालयातील विद्यार्थिनींसाठी लगोरी, रबर रिंग, स्किपिंग रोप, बॅडमिंटन रॅकेट, लुडो, फुटबॉल, थाळी, गोळा आणि लेझीम सेट यांसह विविध क्रीडा साहित्य भेट देण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना राष्ट्रीय बॅडमिंटनपटू तथा पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार म्हणाले, "शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात खेळाला विशेष महत्त्व आहे. खेळातून उत्तम आरोग्य, शिस्त, संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित होतात. प्रत्येक विद्यार्थिनीने आपल्या आवडीच्या खेळात प्राविण्य मिळवून जीवनात यश संपादन करावे." कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रा. रवींद्र चव्हाण आणि संगीता बाविस्कर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. विद्यालयाचे क्रीडा शिक्षक अनिल पवार यांनी क्रीडा साहित्य स्वीकारले. प्रा. अंकिता देशमुख यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. प्रतिभा पाटील, प्रा. संगीता राजपूत, जयदीप पाटील, नंदू पाटील, सुरेखा बडे, उमेश कडलग, पायल पाटील, शिवाजी बागुल, कोमल चव्हाण, शिवराम पाटील, धनराज धनगर आणि शकील खाटीक यांनी परिश्रम घेतले.

# मेहरूण स्मशानभूमीतील सुविधांसाठी नागरिक आक्रमक

## 'प्रशासनाला जागी करा' आंदोलनाचा इशारा



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** जळगाव शहरातील मेहरूण परिसरातील स्मशानभूमीत मूलभूत सुविधांचा अभाव कायम असल्याने स्थानिक नागरिकांनी महापालिका प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. मागील ४५५ दिवसांपासून विविध मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत, येत्या १६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जळगाव शहर महानगरपालिकेसमोर "झोपलेल्या प्रशासनाला जागी करा" या अनोख्या आंदोलनाचा इशारा नागरिकांनी दिला आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांचा अभाव असून, अनेक वेळा प्रशासनाकडे निवेदने देऊनही त्याची दखल घेण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भात नागरिकांनी जळगाव शहर महानगरपालिकेचे आयुक्त आणि महापौर यांना निवेदन सादर केले आहे. हे निवेदन महापौर कार्यालयातील स्वकीय सहाय्यक यांनी स्वीकारले असून, त्यामध्ये स्मशानभूमीतील विविध प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, स्मशानभूमीत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पुरेशी प्रकाशयोजना, अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती, स्वच्छता, बसण्याची व्यवस्था, शेड तसेच इतर अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या सुविधांचा अभाव असल्यामुळे अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही ठोस कार्यवाही होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. त्यामुळे यावेळी आंदोलनाद्वारे महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, १६ ऑगस्टपूर्वी मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेऊन कामांना सुरुवात झाली नाही, तर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. नागरिकांच्या मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रशासनाला आता जागे करण्याची वेळ आली.

# असोदा-मन्यारखेडा रेल्वे अंडरपास बंद; 300 शेतकऱ्यांचा खरीप हंगाम संकटात

## पाणी उपसूनही वाहतूक सुरू नाही; कंत्राटदाराच्या हलगर्जीपणाचा आरोप

जन सम्राट टाईम्स



**जळगाव | प्रतिनिधी :** असोदा–मन्यारखेडा मार्गावरील रेल्वे अंडरपास पावसाळ्यापासून पाण्याखाली गेल्यानंतर दोन ते तीन दिवसांपूर्वी त्यातील पाणी उपसून काढण्यात आले. मात्र, आजतागायत अंडरपास वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला नसल्याने परिसरातील सुमारे २५० ते ३०० शेतकऱ्यांसमोर गंभीर अडचणी निर्माण झाल्या आहेत. खरीप हंगामातील शेतीची कामे रखडल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. पाळधी–तरसोद बायपासवरील खचलेल्या पुलाची पाहणी केल्यानंतर खासदार स्मिता वाघ यांनी संबंधित अधिकाऱ्यांना अंडरपासमधील साचलेले पाणी तातडीने काढण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार पाणी उपसण्यात आले असले, तरी रस्ता अद्यापही बंद असल्याने शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी कोणताही मार्ग उपलब्ध झालेला नाही. अंडरपास बंद असल्यामुळे मशागत, खत व औषध फवारणी, पीक संरक्षण तसेच इतर शेतीची अत्यावश्यक कामे ठप्प झाली आहेत. शेतजमिनी अंडरपासच्या पलीकडे असल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. स्थानिक शेतकऱ्यांनी संबंधित कंत्राटदारावर गंभीर आरोप करताना सांगितले की, फ्लेवर ब्लॉक बसविण्याच्या कामादरम्यान पाण्याचा निचरा करणारी मोरी बंद करण्यात आली. हे काम उन्हाळ्यात पूर्ण होणे अपेक्षित असताना मुदत उलटूनही काम अपूर्ण राहिले आणि पावसाळ्यात अंडरपास पाण्याखाली गेला. या अंडरपासचे काम बी. एन. अग्रवाल या कंत्राटदाराकडे असल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. मात्र, प्रसारमाध्यमांनी याबाबत संपर्क साधला असता संबंधितांकडून "या कामाशी माझा काहीही संबंध नाही," अशी प्रतिक्रिया देण्यात आल्याचा दावा वृत्तात करण्यात आला आहे. दरम्यान, शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तातडीने अंडरपास वाहतुकीसाठी खुला करण्याची, जबाबदार अधिकारी व कंत्राटदाराची चौकशी करण्याची, शेतीसाठी पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्याची तसेच खरीप हंगामाचे नुकसान झाल्यास योग्य नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. स्थानिकांच्या मते, अंडरपासचा प्रश्न तातडीने निकाली न निघाल्यास शेतकऱ्यांचा संपूर्ण खरीप हंगाम धोक्यात येण्याची शक्यता असून, यामुळे प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.खचलेल्या पुलाची पाहणी केल्यानंतर खासदार स्मिता वाघ यांनी संबंधित अधिकाऱ्यांना अंडरपासमधील साचलेले पाणी तातडीने काढण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार पाणी उपसण्यात आले असले, तरी रस्ता अद्यापही बंद असल्याने शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी कोणताही मार्ग उपलब्ध झालेला नाही. खत व औषध फवारणी, पीक संरक्षण तसेच इतर शेतीची अत्यावश्यक कामे ठप्प झाली आहेत.

# धुळे शहर खड्ड्यांच्या विळख्यात; रस्त्यांची दुरवस्था पाहून नागरिक संतप्त

## रस्त्यात खड्डे की खड्ड्यांत रस्ते? व्यापाऱ्यांसह वाहनधारक त्रस्त

जन सम्राट टाईम्स

**धुळे |प्रतिनिधी :** धुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पडलेल्या खड्ड्यांमुळे नागरिक, वाहनधारक आणि व्यापाऱ्यांचे जनजीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे. पावसामुळे रस्त्यांची झालेली दुरवस्था आणि विविध विकासकामांनंतर रस्ते पूर्ववत न केल्याने शहरात "रस्त्यात खड्डे की खड्ड्यांत रस्ते?" अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. दररोज वाहतूक कोंडी, वाहनांचे नुकसान आणि अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. शहरातील आग्रा रोडवरील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर, चाळीसगाव चौफुली मार्ग, ८० फूट रोड, पारोळा रोड, देवपूर यांसह अनेक प्रमुख रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले आहेत. या मार्गांवरून प्रवास करताना दुचाकीस्वार, चारचाकी चालक तसेच पादचाऱ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. खड्डे चुकविण्याच्या प्रयत्नात अनेक लहान-मोठे अपघात घडत असून, वाहनांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. विशेषतः पेठ भागातील रस्त्यांवरील खड्ड्यांमध्ये व्यापाऱ्यांची मालवाहू वाहने अडकत असल्याने व्यापारावरही परिणाम होत आहे. ग्राहकांना ये-जा करताना अडचणी निर्माण होत असून, व्यापाऱ्यांना आर्थिक फटका बसत असल्याची भावना व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, शहरात सुरू असलेल्या



भुयारी गटार योजनेच्या कामामुळे अनेक ठिकाणी रस्ते खोदून ठेवण्यात आले आहेत. मात्र, खोदकाम झालेल्या ठिकाणी आवश्यक सुरक्षा उपाययोजना, सूचना फलक किंवा संरक्षक बॅरिकेड्स नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी अपघाताचा धोका अधिक वाढला असून, संबंधित कंत्राटदाराच्या निष्काळजीपणाबाबत संताप व्यक्त होत आहे. या प्रश्नावर सामाजिक कार्यकर्ते देवेंद्र गायकवाड आणि भूपेश शर्मा यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे. शहरातील खड्डे तातडीने बुजवून नागरिकांना दिलासा द्यावा, अन्यथा तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. अवघ्या काही दिवसांवर गणेशोत्सव येऊन ठेपला असून, उत्सव काळात शहरात मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढणार आहे. अशा परिस्थितीत रस्त्यांची दुरवस्था कायम राहिल्यास अपघातांचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने केवळ तात्पुरती मलमपट्टी न करता, सर्व प्रमुख रस्त्यांची पाहणी करून दर्जेदार आणि कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. शहराच्या विकासाच्या दाव्यांदरम्यान रस्त्यांची झालेली ही अवस्था प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करत असल्याची प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत. आता प्रशासन आणि संबंधित कंत्राटदार तातडीने ठोस पावले उचलतात की नागरिकांना आणखी प्रतीक्षा करावी लागते, याकडे धुळेकरांचे लक्ष लागले आहे. धुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पडलेल्या खड्ड्यांमुळे नागरिक, वाहनधारक आणि व्यापाऱ्यांचे जनजीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे. पावसामुळे रस्त्यांची झालेली दुरवस्था आणि विविध विकासकामांनंतर रस्ते पूर्ववत न केल्याने शहरात "रस्त्यात खड्डे की खड्ड्यांत रस्ते?" अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. दररोज वाहतूक कोंडी, वाहनांचे नुकसान आणि अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

# कोमल भदाणे यशस्वी; एम. फार्मसी परीक्षेत विद्यापीठात तृतीय क्रमांक

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा | प्रतिनिधी:** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या मे-जून २०२६ च्या एम. फार्मसी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, किसान विद्या प्रसारक संस्थेच्या इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन, बोराडीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयाने यंदाही शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखत प्रथम वर्ष एम. फार्मसीचा शंभर टक्के निकाल लावला आहे. या परीक्षेत कोमल दिपक भदाणे हिने ८०.७७ सीजीपीए गुण मिळवत विद्यापीठात तृतीय क्रमांक पटकावला. तिच्या या यशामुळे महाविद्यालयासह पाचोरा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. महाविद्यालयाच्या सातत्यपूर्ण यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, अनुभवी प्राध्यापकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि संस्थेची शैक्षणिक गुणवत्ता हे महत्त्वाचे घटक असल्याचे महाविद्यालय प्रशासनाने सांगितले.



या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, सचिव निशांत रंधे, खजिनदार आशाताई रंधे, बोराडीचे उपसरपंच राहुल रंधे, कर्मवीर पतसंस्थेचे अध्यक्ष शशांक रंधे, नगरसेवक रोहित रंधे, प्राचार्य डॉ. विकास पाटील, उपप्राचार्य डॉ. कल्पेश वाघ, तसेच संस्थेतील प्राध्यापक, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कोमल भदाणे या पाचोरा येथील लक्ष्मण विजय सागर यांच्या सून असून, पी. के. शिंदे प्राथमिक विद्यालयाच्या शिक्षिका सौ. मंगला लक्ष्मण सागर यांच्या त्या सून आहेत. त्यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक, सामाजिक व विविध क्षेत्रांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईस ब्रेक न्यूज ज

# राज्यस्तरीय 'उद्योजक रत्न' पुरस्काराने सोनवणे यांचा गौरव

## हातेड बुद्रुकच्या उद्योजकाचा सन्मान



जन सम्राट टाईम्स

**चोपडा| प्रतिनिधी :** चोपडा तालुक्यातील आदर्श गाव हातेड बुद्रुक येथील युवा उद्योजक गणेश रणछोड सोनवणे यांना त्यांच्या उल्लेखनीय उद्योजकीय कार्याची दखल घेत प्रतिष्ठेचा 'राज्यस्तरीय उद्योजक रत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला. या सन्मानामुळे हातेड बुद्रुक गावासह संपूर्ण चोपडा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

राष्ट्रीय मानवाधिकार आणि भ्रष्टाचार विरोधी सामाजिक न्याय फाउंडेशन, भारत सरकार यांच्या वतीने २ ऑगस्ट २०२६ रोजी धुळे येथे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात गणेश सोनवणे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या गौरवासाठी आयोजित या सोहळ्यात राज्यभरातील अनेक मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. उद्योजकता क्षेत्रात सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द, नावीन्यपूर्ण विचार आणि प्रामाणिक कार्यपद्धतीच्या बळावर गणेश सोनवणे यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.


त्यांच्या या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून त्यांची 'उद्योजक रत्न' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. गणेश सोनवणे यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील तरुण उद्योजकांना नवी प्रेरणा मिळाली असून, कठोर परिश्रम आणि चिकाटीच्या जोरावर यश संपादन करता येते, हा विश्वास अधिक दृढ झाला आहे. त्यांच्या या यशाबद्दल चोपडा तालुक्यासह विविध सामाजिक, व्यावसायिक आणि शैक्षणिक क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यावेळी त्यांचे बंधू प्रवीण शंकराव सोनवणे यांनी भावना व्यक्त करताना, "हा पुरस्कार योग्य व्यक्तीच्या कार्याचा योग्य सन्मान आहे. राष्ट्रीय मानवाधिकार आणि भ्रष्टाचार विरोधी सामाजिक न्याय फाउंडेशन, भारत सरकार यांच्या वतीने २ ऑगस्ट २०२६ रोजी धुळे येथे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात गणेश सोनवणे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या गौरवासाठी आयोजित या सोहळ्यात राज्यभरातील अनेक मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. गणेश यांनी मेहनत, प्रामाणिकपणा आणि सातत्याच्या बळावर हे यश मिळविले असून, त्यांचा हा सन्मान आमच्या संपूर्ण कुटुंबासाठी अभिमानाची बाब आहे," असे सांगितले. या पुरस्कारामुळे गणेश सोनवणे यांच्या कार्याला नवी ओळख मिळाली असून, भविष्यातही उद्योग क्षेत्रात अधिक उल्लेखनीय कार्य करून समाजातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरण्याचा त्यांनी निर्धार व्यक्त केला आहे.

# जे. जे. रुग्णालयात राष्ट्रीय अस्थी व सांधे आरोग्य दिन उत्साहात; सायक्लोथॉनद्वारे आरोग्य जनजागृती

## संतुलित आहार आणि सक्रिय जीवनशैलीचा दिला संदेश

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** राष्ट्रीय अस्थी व सांधे आरोग्य दिनानिमित्त सर जे. जे. रुग्णालयाच्या अस्थिरोग विभागात विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करून हा दिवस उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. अस्थी व सांधे निरोगी ठेवण्यासाठी नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि सक्रिय जीवनशैलीचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित कार्यक्रमाला डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अस्थिरोग विभागाचे विभागप्रमुख डॉ. नादिर झेड. शाह यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटन जे. जे. रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अजय भंडारवार यांच्या हस्ते झाले. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय सुरसे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. रणजित माणकेश्वर, न्यूरोसर्जरी विभागाचे प्रमुख डॉ. व्हर्नन वेल्हो यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमात अस्थी व सांध्यांचे आरोग्य जपण्यासाठी आवश्यक असलेल्या जीवनशैलीविषयी तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. वाढते वय, बदलती जीवनशैली आणि व्यायामाचा अभाव यामुळे हाडे व सांध्यांचे विकार वाढत असल्याचे सांगत नियमित शारीरिक हालचाली, कॅल्शियम व व्हिटॅमिन डी युक्त संतुलित आहार, योग्य वजन राखणे आणि वेळेवर वैद्यकीय तपासणी करण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. परिचारिकांनीही नागरिकांना हाडांची झीज टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी आणि दैनंदिन जीवनातील आरोग्यदायी सवयींबाबत माहिती दिली. यावेळी रुग्णसेवेत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या वरिष्ठ डॉक्टर, निवासी डॉक्टर, परिचारिका तसेच वर्ग-४ कर्मचाऱ्यांचा सत्कार करून त्यांच्या समर्पित सेवेला गौरविण्यात आले. आरोग्यसेवेत योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कार्याचा सन्मान हा कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरला. राष्ट्रीय अस्थी व सांधे आरोग्य दिनानिमित्त आयोजित सायक्लोथॉनलाही मोठा प्रतिसाद मिळाला. डॉक्टर, निवासी डॉक्टर, परिचारिका आणि इतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने सायकल रॅलीत सहभाग घेत शहरातील विविध मार्गांवरून जनजागृती फेरी काढली. या माध्यमातून नियमित व्यायाम, शारीरिक तंदुरुस्ती आणि अस्थी-सांधे निरोगी ठेवण्याचा संदेश नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आला. या उपक्रमाला नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत आरोग्यविषयक संदेशाचे स्वागत केले.

# वेटलिफ्टिंग खेळाडूंसाठी विकसित बेल्टला केंद्र सरकारची मान्यता

## डॉ. क्षीरसागर यांच्या संशोधनाला पेटंटची डिझाईन नोंदणी

जन सम्राट टाईम्स

**चोपडा| प्रतिनिधी :** भारतीय क्रीडा संशोधन क्षेत्रासाठी अभिमानास्पद अशी उपलब्धी नोंदवत वेटलिफ्टिंग खेळाडूंसाठी विकसित करण्यात आलेल्या विशेष बेल्टच्या अभिनव डिझाईनला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून (THE PATENT OFFICE, GOVERNMENT OF INDIA) अधिकृत डिझाईन नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. संशोधक डॉ. क्रांती संदेश क्षीरसागर यांनी विकसित केलेल्या "BELT FOR WEIGHTLIFTING PLAYERS" या डिझाईनची डिझाईन क्रमांक 483810-001 अंतर्गत नोंदणी करण्यात आली असून, या यशामुळे भारतीय क्रीडा विज्ञान आणि नवोपक्रम क्षेत्रात आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठण्यात आला आहे. भारत सरकारच्या DESIGNS ACT, 2000 आणि DESIGNS RULES, 2001 अंतर्गत या डिझाईनला कायदेशीर संरक्षण देण्यात आले आहे. या डिझाईनची नोंदणी १५ डिसेंबर २०२५ रोजी



करण्यात आली होती, तर त्याचे अधिकृत नोंदणीकृत डिझाईन प्रमाणपत्र २५ जून २०२६ रोजी जारी करण्यात आले. डॉ. क्रांती क्षीरसागर यांनी विकसित केलेला हा विशेष बेल्ट वेटलिफ्टिंग खेळाडूंच्या कंबरेला अधिक सक्षम आधार देण्यासाठी तयार करण्यात आला आहे. वजन उचलताना कंबरेवरील ताण कमी करणे, दुखापतींचा धोका कमी करणे आणि खेळाडूंची कामगिरी अधिक प्रभावी व सुरक्षित बनविणे हा या अभिनव डिझाईनचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे हा बेल्ट केवळ क्रीडा साहित्य नसून खेळाडूंच्या सुरक्षिततेसाठी उपयुक्त ठरणारा संशोधनाधारित नवोपक्रम मानला जात आहे. क्रीडा विज्ञान, संशोधन आणि नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाच्या संगमातून विकसित झालेल्या या डिझाईनला मिळालेली केंद्र सरकारची मान्यता ही संशोधन क्षेत्रातील मोठी उपलब्धी मानली जात आहे. भविष्यात अशा संशोधनामुळे भारतीय खेळाडूंना अधिक सुरक्षित आणि दर्जेदार क्रीडा साहित्य उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

भारत सरकारच्या DESIGNS ACT, 2000 आणि DESIGNS RULES, 2001 अंतर्गत या डिझाईनला कायदेशीर संरक्षण देण्यात आले आहे. या डिझाईनची नोंदणी १५ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आली होती, तर त्याचे अधिकृत नोंदणीकृत डिझाईन प्रमाणपत्र २५ जून २०२६ रोजी जारी करण्यात आले.या उल्लेखनीय यशाबद्दल महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. संदीप सुरेश पाटील, संस्थेच्या सचिव डॉ. स्मिता संदीप पाटील, प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे, उपप्राचार्य, प्राध्यापक तसेच क्रीडा, शिक्षण आणि संशोधन क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी डॉ. क्रांती संदेश क्षीरसागर यांचे अभिनंदन केले आहे.

# एम. जे. महाविद्यालयात इंटर इन्स्टिट्यूट ड्रिल स्पर्धा ; विजेत्यांच्या 'शिवगर्जने'ने मैदान दणाणले

## 18 महाराष्ट्र बटालियन एनसीसीचा उपक्रम; जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते विजेत्या संघांचा गौरव, शिस्त व राष्ट्रसेवेचा संदेश

जन सम्राट टाईम्स

**जळगाव। प्रतिनिधी:** 18 महाराष्ट्र बटालियन एनसीसी, जळगाव यांच्या वतीने आयोजित इंटर इन्स्टिट्यूट ड्रिल स्पर्धा एम. जे. महाविद्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. शिस्त, संघभावना, नेतृत्व आणि राष्ट्रसेवा या मूल्यांचा जागर करत आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला विविध महाविद्यालयांतील एनसीसी कॅडेट्सचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धेच्या समारोपप्रसंगी जळगावचे जिल्हाधिकारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या विजेत्या संघांना प्रमाणपत्रे, सन्मानचिन्हे आणि पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

यावेळी एनसीसी अधिकारी, शिक्षक, मार्गदर्शक, कॅडेट्स आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



स्पर्धेतील निकाल जाहीर होताच प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या संघाने दिलेल्या जोशपूर्ण 'शिवगर्जने'ने संपूर्ण मैदान दणाणून गेले. विजयानंतर कॅडेट्सनी व्यक्त केलेला आनंद, शिस्तबद्ध संचलन आणि राष्ट्रभक्तीचा उत्साह उपस्थितांच्या कौतुकाचा विषय ठरला. त्या शिवगर्जनेत कठोर परिश्रमांचे सार्थक, संघभावनेचे बळ आणि देशसेवेचा अभिमान स्पष्टपणे जाणवत होता. यावेळी उपस्थित मान्यवरांनी एनसीसीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, वेळेचे व्यवस्थापन, नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि सामाजिक बांधिलकी विकसित होत असल्याचे सांगितले. राष्ट्रसेवेची भावना रुजविण्यासाठी तसेच जबाबदार नागरिक घडविण्यासाठी अशा स्पर्धा अत्यंत महत्त्वाच्या असल्याचेही त्यांनी नमूद केले. ड्रिल स्पर्धा ही केवळ संचलनाची स्पर्धा नसून ती एकात्मता, समन्वय, मानसिक व शारीरिक तंदुरुस्ती आणि नेतृत्व कौशल्याची कसोटी असते. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संघभावना दृढ होत असून आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी निर्माण होते. त्यामुळे अशा उपक्रमांना शैक्षणिक क्षेत्रात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. स्पर्धेतील सर्व विजेत्या संघांचे मान्यवरांनी अभिनंदन केले.

# ईशानच्या वाढदिवसानिमित्त गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

## महात्मा फुले हायस्कूलमध्ये चित्रकला साहित्य, पेन, कंपास पेटी व मिठाईचे वितरण

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव । प्रतिनिधी:** वाढदिवस हा केवळ आनंद साजरा करण्याचा दिवस नसून समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची संधीही असते, याचा आदर्श धरणगाव येथील कोळी परिवाराने घालून दिला. शहरातील सुवर्ण महोत्सवी महात्मा फुले हायस्कूल येथील उपशिक्षक सुनील नारायण कोळी यांच्या सुपुत्र चि. ईशान यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्य व मिठाईचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांकडून विशेष कौतुक करण्यात आले.



शाळेत आयोजित कार्यक्रमात चित्रकला वही, रंगपेटी, कलर पेन्सिल बॉक्स, पेन, कंपास पेटी आदी शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना भेट देण्यात आले. यामुळे गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक जे. एस. पवार होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पी. डी. पाटील यांनी केले. उपस्थित सर्व शिक्षक-शिक्षिकांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना मुख्याध्यापक जे. एस. पवार यांनी कोळी परिवाराच्या सामाजिक जाणिवेचे कौतुक केले. "वाढदिवस मोठ्या खर्चात साजरा करण्यापेक्षा गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे ही खऱ्या अर्थाने समाजसेवा आहे. प्रत्येक शिक्षकाने आपल्या मुलांच्या वाढदिवसानिमित्त अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन केल्यास अनेक विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल," असे आवाहन त्यांनी केले. या उपक्रमाचे विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांकडून विशेष कौतुक करण्यात आले. शाळेत आयोजित कार्यक्रमात चित्रकला वही, रंगपेटी, कलर पेन्सिल बॉक्स, पेन, कंपास पेटी आदी शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना भेट देण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबाबत सकारात्मक प्रेरणा निर्माण झाली असून, सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ होत असल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली. वाढदिवसासारख्या आनंदाच्या क्षणाला समाजोपयोगी कार्याची जोड दिल्यास समाजात सकारात्मक संदेश पोहोचतो, असे मतही अनेकांनी व्यक्त केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मिठाईचेही वाटप करण्यात आले. यामुळे शाळेत आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कोळी परिवाराच्या या उपक्रमामुळे वाढदिवस साजरा करण्याची एक वेगळी आणि प्रेरणादायी परंपरा समाजासमोर आली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. डी. पाटील यांनी केले, तर एच. डी. माळी यांनी आभार मानले.

# दीर्घकाळ कार्यरत पोलिस कर्मचाऱ्यांच्या जिल्ह्याबाहेरील बदल्यांची मागणी!

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा । प्रतिनिधी:** जळगाव जिल्हा पोलिस दलात अनेक अधिकारी आणि कर्मचारी प्रशासकीय कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतरही एकाच पोलीस ठाण्यात किंवा एकाच विभागात दीर्घकाळ कार्यरत असल्याचा आरोप करत त्यांच्या जिल्ह्याबाहेरील बदल्या करण्यात याव्यात, अशी मागणी बल्लाळेश्वर फाऊंडेशनचे अध्यक्ष हरीभाऊ तुकाराम पाटील यांनी जिल्हा पोलिस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, बदलीचा नियमानुसार कार्यकाळ संपल्यानंतरही काही अधिकारी व कर्मचारी राजकीय हस्तक्षेप, दबावतंत्र किंवा इतर मार्गांचा वापर करून एकाच ठिकाणी सेवा बजावत आहेत. त्यामुळे बदली धोरणाचे उल्लंघन होत असून पोलिस प्रशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. तक्रारीनुसार, काही कर्मचारी व अधिकारी स्वतःच्या तालुक्यात किंवा घरापासून अवघ्या १० ते १५ किलोमीटर अंतरावरील पोलीस ठाण्यांमध्येच वारंवार बदली करून घेत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेषतः पाचोरा-भडगाव परिसरात अशा प्रकारांची संख्या अधिक असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. याशिवाय, करण्यात आला आहे. वरिष्ठ स्तरावर कार्यकाळ वाढीचा कोणताही लेखी आदेश नसतानाही काही कर्मचारी आस्थापना विभागाशी संगनमत करून त्याच नियुक्तीच्या ठिकाणी वेतन घेत असल्याचा गंभीर आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलिस अधीक्षकांनी सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सेवा नोंदींची सखोल तपासणी करून बदली नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, त्यांची तातडीने मुख्यालयात रवानगी करावी.